लहान जल विद्युत प्रकल्पांच्या उपलब्ध जागेवर सौर /पवन ऊर्जा प्रकल्प (Hybrid) आस्थापित करण्याच्या दृष्टीने धोरण निश्चितीसाठी समिती गठित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक:- सौरप्र-२०१८/प्र.क्र.५०७/ऊर्जा-७

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २१ ऑगस्ट, २०१९

संदर्भ - जलसंपदा विभागाच्या नस्ती क्र. संकिर्ण २०१८/प्र.क्र.२२५/ज.वि. अन्वये प्राप्त प्रस्ताव.

प्रस्तावना :-

नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन केंद्र शासनाने अशा ऊर्जा स्त्रोतांद्वारे देशात सन २०२२ पर्यंत १७५ गिगावॅट एवढा वीज निर्मितीचा विस्तार करण्याचे उद्दिष्टे जाहीर केले आहे. यामध्ये १०० गिगावॅट सौर ऊर्जा व ६० गिगावॅट पवन ऊर्जा निर्मितीचा समावेश आहे. त्या दृष्टीने देशभरात व राज्यांमध्ये नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीचे कार्यक्रम हाती घ्यावयाचे आहेत.

२. राज्यात नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोत मुबलक प्रमाणात आहेत. त्यातील पवन व सौर यासारख्या स्त्रोतांबरोबरच ऊसाची चिपाडे, कृषिजन्य टाकाऊ पदार्थ, सेंद्रीय टाकाऊ पदार्थ, वैद्यकीय टाकाऊ पदार्थ, खनिजजन्य व इतर टाकाऊ पदार्थासह औद्योगिक टाकाऊ पदार्थासारख्या स्त्रोतांपासून वीज निर्मिती करता येणे शक्य आहे. या सर्व स्त्रोतांचे महत्व व वाव लक्षात घेऊन पवन ऊर्जेपासून वीज निर्मिती,ऊसाची चिपाडे/कृषी अवशेषांवर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्प, लहान जल विद्युत निर्मिती प्रकल्प, कृषिजन्य टाकाऊ पदार्थ, सेंद्रिय टाकाऊ पदार्थ / वैद्यकीय टाकाऊ पदार्थ / खनिजजन्य व इतर टाकाऊ पदार्थासह औद्योगिक टाकाऊ पदार्थापासून वीज निर्मिती प्रकल्प व सौर ऊर्जेपासून वीज निर्मिती प्रकल्प अशा पारेषण संलग्न प्रकल्पांना चालना देण्यासाठी एकत्रित धोरण दिनांक २० जुलै, २०१५ रोजी जाहीर केले आहे.

३. राज्यातील ऊर्जेची वाढती मागणी लक्षात घेता नवीन व नवीकरणीय (अपारंपारिक) ऊर्जा स्त्रोताचा कमाल विकास करणे अपरिहार्य आहे. त्यासाठी उपलब्ध स्त्रोतांचा महत्तम वापर करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने, राज्यात विविध धरणांवरील (विकासकांच्या मदतीने उभारलेले जलविद्युत प्रकल्प) लहान जलविद्युत प्रकल्पांच्या स्थळी मोठ्या प्रमाणात जमिन उपलब्ध होऊ शकते. अशा जमिनीवर सौर/पवन ऊर्जा प्रकल्प उभारण्यास मोठया प्रमाणात वाव आहे, ही बाब विचारात घेऊन जलसंपदा विभागाकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने अशा लहान जलविद्युत प्रकल्पांच्या जमिनीवर सौर-पवन ऊर्जा प्रकल्प (Hybrid) आस्थापित करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व बाबी / कामकाज / कार्यपध्दती / अंमलबजावणी / प्रकल्पाची आर्थिक व्यवहार्यता / वीजेचा दर / प्रकल्पाची नोंदणी इ. निश्चित करण्यासाठी समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

जलसंपदा विभागाच्या अखत्यारितीतील लहान जलविद्युत प्रकल्पांच्या (विकासकांच्या मदतीने उभारलेले जलविद्युत प्रकल्प) उपलब्ध जागेवर सौर - पवन ऊर्जा प्रकल्प (Hybrid) आस्थापित करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व बाबी / कामकाज / कार्यपध्दती / अंमलबजावणी / प्रकल्पाची आर्थिक व्यवहार्यता / वीजेचा दर / प्रकल्पाची नोंदणी इ. निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यास शासन मान्यता देत आहे.

अ) समितीची रचना:-

सदर समितीमध्ये खालीलप्रमाणे सदस्य राहतील.

१) संचालक (वाणिज्य), महावितरण, कंपनी	- अध्यक्ष
२) मुख्य अभियंता, स्ट्रेट स्ट्रान्समिशन युनिट	- सदस्य
३) मुख्य अभियंता,(स्थापत्य), जलविदयुत प्रकल्प व गुणनियंत्रण जलसंपदा विभाग, पुणे.	- सदस्य
४) मुख्य अभियंता (विदयुत), जलविदयुत प्रकल्प, मुंबई.	- सदस्य
५) उप संचालक, पर्यावरण विभाग	- सदस्य
६) अतिरिक्त महासंचालक, महाऊर्जा	- सदस्य
७) उप सचिव, महसूल विभाग	- सदस्य
८) अधिक्षक अभियंता (न. व न.ऊ.) महावितरण, कंपनी	- सदस्य सचिव

ब) समितीचे कार्य :-

१) लहान जलविदयुत प्रकल्पांच्या उपलब्ध जागेवर सौर- पवन ऊर्जा प्रकल्प (Hybrid) आस्थापित करण्याचे धोरण तयार करून शासनास शिफारस करणे.

२) सदर प्रकल्पांमुळे पर्यावरणावरील होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

३) प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता तपासणे, अनुषंगिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.

४) सदर प्रकल्पासाठी आवश्यक ती निष्कासन व्यवस्था उपलब्ध करुन देणे, उपलब्ध निष्कासन व्यवस्थेचा वापर करणे.

५) सदर प्रकल्पाशी संबंधित सर्व बाबी/कामकाज/कार्यपध्दती/अंमलबजावणी व तदनुषंगिक मुद्यांबाबतची निश्चिती करणे व आवश्यक कार्यवाही करण्याबाबत शिफारशी करणे.

६) अशा प्रकल्पातून निर्मित विजेचा दर ठरविणे, प्रकल्पाची नोंदणी इत्यादी बाबत कार्यपध्दती निश्चित करून शिफारस करणे.

७) जलविद्युत - सौर - पवन ऊर्जा प्रकल्प (Hybrid), आस्थापित करण्यासाठी धोरण निश्चितीसाठी शासनास शिफारस करणे.

क) सदर समिती आपला सर्व समावेशक परिपूर्ण बृहत आराखडा २ महिन्यात तयार करून शासनास सादर करेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२११४५२१७८०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prashant Pundlik Badgeri

Digitally signed by Prashant Pundlik Badgeri
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=07ae22a8e7fa4047ce6ff816d85e77eec14db9926b325a140acf9b28bb990786, serialNumber=ec955e2d360e1fddb6abac58a907419053beeceb5dbac48a78c89c588ff71bef, cn=Prashant Pundlik Badgeri
Date: 2019.08.21 14:57:45 +05'30'

(प्र. पुं. बडगेरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) सर्व मंत्री / सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मुंबई,
४) विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधान भवन, मुंबई
५) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
६) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
७) प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव यांचे स्वीय सहायक, सर्व मंत्रालयीन विभाग,
१०) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई,१/२
११) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, नागपूर,१/२
१२) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
१३) सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई (पत्राने),
१४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सूत्रधार कंपनी मर्या., मुंबई,
१५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., मुंबई,
१६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या., मुंबई,
१७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या., मुंबई,
१८) महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे,
१९) उप सचिव / ऊर्जा-३, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०) ऊर्जा उप विभागातील सर्व कार्यासने, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
२१) समितीचे सदस्य.
२२) निवड नस्ती, ऊर्जा-७, ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.